॥ श्री सद्‌गुरु अडाणेश्वर समर्थ ॥

# ३८ वा

# महासमाधी दिन

## 'सुश्री निलोमा अडाणेश्वर सेवाश्रम'

- www.nilomaadaneshwar.org
- www.adaneshwar.org

रजि. नं. 502/2007

दादाजी नगर, सुभाष नगर नाला जवळ,
आदिलाबाद (तेलंगणा)

# श्री सद्‌गुरु अडाणेश्वर माहात्म्य ग्रंथ सप्ताह

**08.01.2025 ते 14.01.2025**

# * महाप्रसाद *

**दि. 15.01.2025**

॥ ॐ ॥

॥ श्री सद्‌गुरु अडाणेश्वर समर्थ ॥

# "३८ वा महासमाधी दिन"

८ जाने. ते १५ जाने. २०२५

"गुरु चरणीमे आई हूँ मैं ।
अडाणेश्वर को बस देखूँ मैं ॥"

प्रिय सद्भक्त,

परम पवित्र सद्‌गुरु स्मरण.

अंधारा कडून प्रकाशा कडे जाण्यासाठी प्रत्येक जीव अविरत प्रयत्न करितच असतो. पण मोहवश जीवाला प्रकाशाकडे जाणे, त्याला शोधणे म्हणजे नेमके काय? हे अज्ञानामुळे त्याला ज्ञात नसते. प्रकाशाकडे वाटचाल म्हणजे लौकीक सुख प्राप्तीची धडपड हीच त्याची प्रामाणीक समजूत असते. त्या अनुषंगानेच तो दिशाहीन होवून भरकटत असतो. कारण संसारासक्त मन मोहापोटी स्वार्थ व हव्यासा मुळे कळत नकळत अशुद्ध कर्म आचरत असतो. अज्ञानामुळे अशुद्ध कर्म त्याला अधोगतीकडेच घेवून जातेय ह्याचे भान त्याला नसते. या अशुद्ध कर्मामुळेच जीवाच्यां वाट्याला असंख्य भोग, अगणित यातना वाट्याला येतात. या यातनेतून सुटका करण्यासाठी त्याची धडपड त्याला चुकीच्या मार्गाने फरफटत नेते.

ज्या शांती सुखाच्या कल्पनेने भारावलेला जीव मृगजळा प्रमाणे खोट्या सुखाच्या नादी आयुष्य वेचतो, ते सुख त्याच्या हाती लागतच नाही. पण पापकर्मच जीवनात घडत राहाते. या सर्व अज्ञानातून मानव जन्मात जीव स्वत:ची सहज सुटका करुन घेवू शकतो. जेव्हा कणभर पुण्याईने त्याला सद्गुरु भक्तीचा मार्ग गवसतो, त्याला सत्संगाचा, सेवेचा लळा लागतो. कणभर पुण्य प्राप्त झालेला हा ठेवा जतन करण्यासाठी जीवाला योग्य बोध करुन नि:स्वार्थ वृत्तीने पापमार्गातून बाहेर काढणारा सत्संग अथवा सद्भक्ताचा सहवास भेटावा लागतो. असा योग जीवनात येणे हे ही महद भाग्यच!

मानव जन्मी सद्गुरु महिमा जीवोद्धारासाठी अत्यंत महत्वाची आहे. जीवाला सद्गुरु महिमा कळावा व त्याला सद्गुरु सेवेचे वेड जडावे भक्तीचा खरा अर्थ उमजावा यासाठीच अलौकीक दिव्य महात्म्य सप्ताह सुश्री निलोमा अडाणेश्वर सेवाश्रम आदिलाबादला सहजपणे लाभतो. सद्गुरु कृपेने हा दिव्य सत्संग या वर्षी देखील ८ जाने. ते १४ जाने. २०२५ पर्यंत सेवाभावाने प्राप्त होणार आहे.

सद्गुरु कृपेच्या या पावन वर्षावात येवून मोहमाया बाजूला सारुन षड्विकारांना शुध्द करण्यासाठी अखंड अडाणेश्वर सहवास, चिंतन, मनन करण्याचे परमभाग्य जीवाला लाभणार आहे.

सद्गुरु चरणी बसून फक्त त्यालाच ध्यानी, मनी, चिंतनी स्मरुन, जळी स्थळी, पाषाणी प्रत्येक जीवा मधे अनुभवायचे आहे. जीवाला खरी प्रकाशाची, शाश्वत आनंदाची वाट म्हणजेच अज्ञानाकडून आत्मज्ञानाकडे घेवून जायचे आहे. आत्मज्ञान हिच जीवनाची प्रकाशमय अवस्था हे सत्य जाणायचे आहे.

गुरु चरणी चारीधाम हे त्रिवार सत्य वचन अनुभवण्यासाठीच आपल्या सर्व बद्द, मुमुक्ष, साधक जीवांनी या सोहळयात सहभागी होवून जीवोद्धार साधायचा आहे. चला तर मग, मनराजाला तयार करु या आत्मबोधाचे भोजन जीवाला देण्यासाठी आदिलाबादला पोचायचे आहे. मायेची धार बोथट करुन अडाणेश्वर कृपेची धार प्राप्त करण्यासाठी जीवाची ओढ जागू द्या.

।। जय दादाजी जय अडाणेश्वर ।।

आपल्या शुभ आगमनाच्या प्रतिक्षेत...

भक्त मंडळ
सुश्री निलोमा अडाणेश्वर
सेवाश्रम, आदिलाबाद (तेलंगणा)

## कार्यक्रम दिनांक : 8/1/2025

| | |
|---|---|
| आरती | स. 7.00 वा. |
| पादुकाभिषेक | स. 9.00 वा. |
| ग्रंथ पारायण (अध्याय ८ वा) | स. 10.00 ते 12.00 वा. |
| महाप्रसाद | दु. 12.30 ते 2.00 वा. |
| स्वानुभव कथन | दु. 4.00 ते 6.30 वा. |
| आरती | सायं. 7.00 वा. |
| भजन | रात्री 9.00 वा. |

## दि. 9/1/2025 ते 13/1/2025

| | |
|---|---|
| आरती | स. 7.00 वा. |
| ग्रंथ पारायण | स. 10.00 ते 12.00 वा. |
| महाप्रसाद | दु. 12.30 ते 2.00 वा. |
| स्वानुभव कथन | दु. 4.00 ते 6.30 वा. |
| आरती | सायं. 7.00 वा. |
| भजन | रात्री 9.00 वा. |

## दि. 14/1/2025

| | |
|---|---|
| आरती | स. 7.00 वा. |
| ग्रंथ पारायण | स. 10.00 ते 12.00 वा. |
| महाप्रसाद | दु. 12.00 ते 1.00 वा. |
| पालकी शोभायात्रा | सायं. 3.00 वा. |
| आरती | सायं. 7.00 वा. |
| भजन | रात्री 9.00 वा. |

## दि. 15/1/2025

| | |
|---|---|
| आरती | स. 7.00 वा. |
| स्तोत्र पारायण, महायज्ञ | स. 10.30 ते 12.00 वा. |
| आरती व काला | दु. 12.00 वा. |
| महाप्रसाद | दु. 1.00 ते 4.00 वा. |

**अखंड विणावादन : 8/1/2025 ते 15/1/2025 पर्यंत**

* **विशेष सुचना : 13 जाने. 2025 पौर्णिमा**

प्रति,
श्री/श्रीमती ______________________

______________________

______________________

जिसके मन मे सद्‌गुरु का प्रेम उत्पन्न हो गया है, उसपर सद्‌गुरु की खास दया समझनी चाहिए। क्योंकी सद्‌गुरु के चरणों की प्रीत एक ऐसी रोशनी है, जो सद्‌गुरु और जीव के बीच जितने परदे है, उस सबको साफ कर देती है।

– परमपुज्य दादाजी अमृतवचन

ह्या कार्यक्रमा व्यतिरिक्त मंदिर परिसर शुभ्र करणे, भक्त परिचय, अनुभव कथन व सत्संग अधुन मधुन घेण्यात येईल.

**ब्लँकेट सोबत आणावे.**

संपर्का करीता भ्रमणध्वनी क्रमांक
Cell. 09440441758, 09866017135
09848777767, 08019392145

– विनीत –
कार्यकारीणी व श्रेयोभिलाषी

**सुश्री निलोमा अडाणेश्वर सेवाश्रम**
दादाजी नगर, आदिलाबाद – 504 001 (तेलंगणा)